**स्थायी निदेश क्र. २३-२०२५**

**नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापनावर**
**दिव्यांग उमेदवाराची पदभरती करणेबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रस/प्र.क्र.२९/स्थायी नि.२३-२०२५/नप.आस्था.दिव्या.उमे.पद.कक्ष-१२/1956**
**दिनांक -: 28 FEB 2025**

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती (समान संधी संपुर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ३३ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी गट अ ते ड मधील पदावर नियुक्तीसाठी ३% आरक्षण दिनांक २ मे,१९९८ च्या परिपत्राकान्वये विहित करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाने दि. २०/११/१९८९ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अपंगासाठी गट क व ड च्या सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर पदोन्नतीसाठी ३% आरक्षण लागु करण्यात आले होते. केंद्र शासनाने दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ पारित केला असुन अपंग व्यक्ती (समान संधी संपुर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ व्यपगत झाला आहे. दिनांक १५/०६/२०१७ रोजीच्या अधिसुचनेव्दारे दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम,२०१६ अंमलात आणलेले आहे. केंद्र शासनाने दिनांक १५/०१/२०१८ च्या कार्यालयीन आदेशान्वये दिव्यांगाच्या १) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता /मेंदुचा पक्षघात (Cerebral Plasy) / कृष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त(Acid Attack victims) /स्थायुविकृती (muscular dystrophy) ४) स्वमग्नता (Autism) मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability)/मानसिक आजार (mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणारे अशा विविध ५ प्रकारांसाठी ४% आरक्षण विहित केलेले आहे.

तथापी राज्यातील बऱ्याच नगरपालिका / नगरपंचायत मध्ये पदांचा वेळीच आढावा न घेणे व त्यामुळे नगरपंचायत आस्थापना वरील पदे रिक्त राहत असल्यामुळे शासन निर्देशानुसार सरळसेवेवरील नियुक्त्यांसाठी विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) ची प्रभावीपणे अमंलबजावणी होत नाही.

सदर बाब विचारात घेऊन महाराष्ट्र नगरपरिषद / नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) व (२) नुसार संचालकांना प्राप्त असलेल्या अधिकारात मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची गरज लक्षात घेऊन खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>आदेश:-</u>**

**१.** दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार विहित प्रमाणात दिव्यांगत्व असणाऱ्या व्यक्तींना पद आणि सेवेमध्ये आरक्षणासंदर्भात कलम २ (R) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे,दिव्यांग व्यक्तीसाठी शासन सेवेत प्रवेशासाठी दिव्यांगांच्या खाली नमुद करण्यात आलेल्या पाच गटापैकी गट अ,ब,क साठी

प्रत्येकी १% तसेच गट ड व ई साठी १% प्रमाणे ४% आरक्षण विहित करण्यात येत आहे. सरळसेवा भरतीमध्ये विहित दिव्यांगत्व असणाऱ्या सर्व संवर्गासाठी रिक्त पदाच्या ४% पदे दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित ठेवण्यात यावीत.

अ) अंध / अल्पदृष्टी

ब) कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता.

क) अस्थीव्यंगता / मेंदुचा पक्षघात ( Cerebral Palsy) / कृष्ठरोग मुक्त (leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्थायु विकृती (muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism) / मंदाबृद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता ( Intellectual Disability) विशिष्ट शिक्षण अक्षमता (specific learning disability) / मानसिक आजार (menral illness)

इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचेसाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर.

**२.** दिव्यांगाचे आरक्षण सर्व गटातील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी लागु आहे. त्याचप्रमाणे दिव्यांगांच्या पदोन्नतीसाठी हे आरक्षण फक्त गट ड मधुन गट ड मधील,गट ड मधुन गट क मधील व गट क मधुन गट क मधील पदांसाठी लागु आहे.(संदर्भ : शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं.अपंग १००३/प्र.क्रं.१२७/२००३/१६,दि.०६/०५/२००४.)

**३.** दिव्यांग व्यक्ती (समान संधी,संपुर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५,नुसार शासन निर्णय नगर विकास विभाग निर्णय क्रं.जीईएन १२०४/५५९/प्र.क्रं.१०७/०४/नवि-१४,दि.०१८/०८/२००५,मधील परिशिष्ट - अ मधील पदांना लागु आहे व परिशिष्ट - ब मधील पदे दिव्यांगाचे आरक्षणातुन वगळण्यात आलेली आहे.

तथापी या व्यतिरिक्त आकृतिबंधात मंजुर असलेले पद,परंतु उपरोक्त नमुद शासन निर्णयातील परिशिष्ट अ व परिशिष्ट ब मध्ये समाविष्ट नसलेले पद दिव्यांगाकरीताचे आरक्षणातुन वगळवायचे असल्यास नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक असेल.

**४.** दिव्यांग व्यक्तीसाठी शासन सेवा प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा वय वर्ष ४५ इतकी राहील.

**५.** दिव्यागांचा लाभ घेवु इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या दिव्यांग प्रमाणपत्राची तपासणी / फेर तपासणी करीता नियुक्ती प्राधिकारी यांनी दिव्यांग प्रमाणपत्र बाबतचे सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १४/०९/२०१८ च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अनुसार दिव्यांगत्व तपासणी,मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे करावी.

**६.** नगरपालिका नगरपंचायत एखाद्या कर्मचारीला त्यांच्या सेवेच्या दरम्यान दिव्यांगत्व आल्यास बडतर्फ किंवा त्याचे / तिचे पद कमी करू शकनार नाही. मात्र दिव्यांगत्व आल्यानंतर साभांळत असलेल्या पदासाठी कर्मचारी योग्य ठरत नसल्यास,त्याला / तिला दुसऱ्या पदावर त्याच पगार व सेवा लाभांसह स्थानांतरीत करावे.

**७.** जर दिव्यांग उमेदवाराची इतर उमेदवाराप्रमाणेच व प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल अशा उमेदवारांची गणना दिव्यांगासाठी आरक्षित जागेवर करण्यात येऊ नये व दिव्यांगासाठी आरक्षित पदे / पद इतर दिव्यांग उमेदवारांमधुन भरण्यात यावीत.

८. विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) भरतांना खालील प्रमाणे कार्यावाही करण्यात यावी.

अ) प्रथम सामाजिक आरक्षण व खुल्या प्रवर्गातुन भरावयाच्या पदांची संख्या निश्चित करावयाची आहे. या पदांमध्ये कप्पीकृत (Compartment) करून विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) अंतर्गत पदांची संख्या निश्चित करावयाची आहे.

ब) समांतर आरक्षण भरण्यासाठी नगरपरिषदेने गट क आणि गट ड साठी रिक्त होणाऱ्या पदांची १०० बिंदु नोंदवही ठेवावी.

क) बिंदु नोंदवही मध्ये बिंदु क्रमांक १,२६,५१ व ७६ बिंदु दिव्यांगासाठी शासनाने आरक्षित केलेले आहे. व सदर बिंदुची विभागणी खालील चार गटात करण्यात आलेली आहे.

गट १ बिंदु क्रमांक १ ते २५
गट २ बिंदु क्रमांक २६ ते ५०
गट ३ बिंदु क्रमांक ५१ ते ७५
गट ४ बिंदु क्रमांक ७६ ते १००.

बिंदु क्रमांक १,२६,५१ व ७६ दिव्यांगासाठी निश्चित करण्यात येत असुन, त्यावर दिव्यांगाच्या प्रकारानुसार त्यांच्यासाठी सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्तीच्या क्रमांकावर त्यांच्या प्रवर्गानुसार त्यांचा बिंदु निश्चित होत असेल तेथे त्यांचा समावेश करण्यात यावा.

एखाद्या पदासाठी दिव्यांगाचा कोणताही एकच प्रकार सुनिश्चित असल्यास गट १ मधील बिंदु पासुन सुरूवात करावी.

एकापेक्षा जास्त प्रकारातील पदे सुनिश्चित असल्यास,१) अंध/अल्पदृष्टी २) कर्णबधीरता अथवा एकु येण्यातील दुर्बलता ३) अस्थीव्यंगता/मेंदुचा पक्षघात(cerebral Palsy)/ कृष्ठरोग मुक्त(leprosy cured)/ शारीरिक वाढ खुंटणे(dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त(acid attack victims)/ स्थायुविकृती (muscular dystrophy) ४)स्वमग्नता(autism)/मंदाबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/ विशिष्ट शिक्षण अक्षमता(specific learning disability)/ मानसिक आजार(Mental illness) ५) वरील १ ते ४ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील याची खातरजमा करावी.

जरी बिंदु क्रमांक १,२६,५१,७६ दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असेल तरी उक्त बिंदुवर त्यांचा समावेश होत नसल्यास त्यांच्यासाठी आरक्षित गटातच त्यांना दर्शविण्याची दक्षता घेण्यात यावी. एखाद्या वेळी गट १ मधील १ ते २५ बिंदु वर काही कारणास्तव उमेदवाराचा समावेश करणे शक्य होत नसल्यास गट २ मधील दोन बिंदुंचा सुयोग्य वापर करण्यात यावा.म्हणजेच एका गटात बिंदु राखीव ठेवणे काही कारणास्तव शक्य न झाल्यास तो पुढील गटात समावेश करणे आवश्यक राहील.१०० बिंदु नामावली पुर्ण झाल्यास पुन्हा पहिल्या बिंदुपासुन गणना सुरू करावी.बिंदु नामावलीचा नमुना **प्रपत्र अ** सोबत देण्यात येत आहे.

ड) समातंर आरक्षणातुन रिक्त पद भरतांना जर सामाजिक आरक्षणाचा अनुशेष असेल तर त्या प्रवर्गातुन भरावा.आणि जर अनुशेष नसेल तर खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षण भरावे.

इ) समांतर आरक्षणातुन नेमलेला उमेदवार बिंदु नामावली मध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणल्या जाईल.

ई) दिव्यांगासाठी आरक्षित जागेसाठी पात्र उमेदवार मिळत नसल्यास दिव्यांग आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्ती मध्ये सुट देता येईल,तथापी अशी सुट खुला व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील सर्व उमेदवारांना एकसारखे असेल कुठल्याही परिस्थितीत विहीत अंपगत्वाच्या प्रमाणात सुट देता येणार नाही.

९. एखाद्या भरतीवर्षात विहीत दिव्यांगत्व असलेली पात्र दिव्यांग व्यक्ती उपलबध झाली नाही तर त्या दिव्यांगाच्या प्रकारासाठी आरक्षित जागेचा अनुशेष पुढील भरती वर्षासाठी पुढे ओढण्यात यावा.ती जागा

इतर कोणत्याही उमेदवारांमधुन भरण्यात येऊ नये.जर पुढील भरती वर्षातही विशिष्ट दिव्यांग प्रकारासाठी आरक्षित पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही तर अन्य दिव्यांग प्रकारातुन अंतर्गत परिवर्तनाने पदभरती करावी.अंतर्गत परिवर्तनातुन पद भरती करण्यात आल्यास आरक्षणाने पद भरण्यात आले असे समाजावे.अंतरगत परिवर्तनानेही सदर पद भरणे शक्य न झाल्याससदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधुन भरण्यात यावे.वरील प्रमाणे इतर पर्याय उपयोगात आणन्यासाठी पद भरतीची जाहिरात देतांना " मागील वर्षातील अनुशेषाची पदे भरतांना सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तानाने पदभरती करण्यात येईल.व तेही शक्य न झाल्यास सदर पद दिव्यांगा व्यतिरिक्त इतर उमेदवारांमधुन भरण्यात येईल"असे स्पष्टपणे नमुद करावे.

**१०.** प्रत्येक भरती वर्षात दिव्यांगासाठी विहीत आरक्षणानुसार पदभरती मध्ये आरक्षणा ठेवावे असे करतांना मागील भरती वर्षातील अनुशेषाच्या जागा प्रथम भरण्यात याव्या व चालु भरती वर्षाच्या जागा भरणे शक्य नसल्यास पुढे ओढण्यात येतील याबाबतचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीत करावा.

**११.** एखाद्या सामाजिक आरक्षण प्रवर्गातील अथवा खुला प्रवर्गातील दिव्यांग उमेदवाराची विहीत कार्यपद्धतीद्वारे निवड झाल्यास परंतु त्या समाजिक आरक्षण प्रवर्ग अथवा खुला प्रवर्गाचा बिंदु रिक्त नसल्यास भविष्यात त्याच्या / तिच्या प्रवर्गाच्या रिक्त होणाऱ्या बिंदुवर त्याचा / तिचा समावेश करण्यात यावा.अन्य बिंदु त्याचा / तिचा समावेश करण्यात येवु नये.

**१२.** नगरपालिका / नगरपंचायत ने वर्ग ३ च्या पदासाठी जिल्हा निवड समितीकडे मागणी पत्र पाठवितांना दिव्यांग करीतांचे आरक्षण स्पष्टपणे दर्शवावे सदर मागणी पत्र पाठवितांना मागणीपत्रा सोबत प्रपत्र ब मधील प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपालिका प्रशासन यांनी दरवर्षी जिल्ह्यातील नगरपालिका / नगरपंचायत यांचा बिंदु नामावली व रिक्त पदांचा आढावा घेवुन माहिती संचालनालयास दरवर्षी दि.२८ फेब्रुवारी सादर करणे बंधनकारक असेल.

**१३.** नगरपरिषदा / नगरपंचायत आस्थापना दिव्यांग उमेदवार लिपीक टंक्कलेखक पदावर सेवा प्रविष्ठ झाल्यानंतर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी,मराठी) परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासुन २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात यावी.

**१४.** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ चे कलम २३ अन्वये प्रत्येक नगरपालिका / नगरपंचायत अतंर्गत सबंधित मुख्याधिकारी तक्रार निवारण अधिकारी असतील. तसेच जिल्ह्याचे जिल्हा प्रशासन अधिकारी,नगर पालिका प्रशासन अपिलीय प्राधिकारी असतील.

**१५.** जिल्हास्तरीय दिव्यांगत्व समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

| | |
|---|---|
| जिल्हा प्रशासन अधिकारी,नगर पालिका प्रशासन | अध्यक्ष |
| जिल्हा प्रशासन अधिकारी नामनिर्देशित करतील अशा नगरपालिका/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी | सदस्य सचिव |
| जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |

प्रत्येक नगरपालिका / नगरपंचायत बाबत जिल्हास्तरीय दिव्यांगत्व समितीचे आदेश स्वतंत्रपणे जिल्हा प्रशासन अधिकार,नगरपालिका प्रशासन हे निर्गमित करतील.

**१६.** तक्रार निवारण अधिकारी यांनी त्यांच्या दाखल केलेल्या तक्रारीवर ३० दिवसामध्ये आवश्यक कार्यावाही करणे बंधनकारक असेल.सदरच्या कार्यावाहीने तक्रारकर्त्याचे समाधान न झाल्यास तक्रार निवारण अधिकारी यांचा आदेश मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत जिल्हास्तरीय दिव्यांगत्व समितीकडे अपील अर्ज दाखल करू शकेल.जिल्हास्तरीय दिव्यांगत्व समितीने सदर अपील अर्जावर ४५ दिवसात कार्यावाही करणे बंधनकारक असेल.

**१७.** महाराष्ट्र नागरी सेवा नियमाव्दारे दिलेल्या लाभाव्यतिरिक्त महाराष्ट्र शासन दिव्यांग कर्मचाऱ्यांना काही इतर लाभ देतात.उदा.अंपगत्व पेन्शन काळजी वाहक भत्ता,विमा योजना यापैकी आपल्या नगरपरिषद /

नगरपंचायत मधील दिव्यांग कर्मचाऱ्यांना सदर लाभ लागु करावयाचे असल्यास याबाबत नगरपरिषद / नगरपंचायत ने आपली आर्थिक स्थिती विचारात घेऊन निर्णय घेण्यास नगरपालिका / नगरपंचायत सक्षम असतील हे निर्णय खालीलप्रमाणे.

अ) नगरपरिषद कर्मचाऱ्यांना लाभ मंजुर करतांना आस्थापना खर्च शासनाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असु नये.(आस्थापना खर्चाची परिगणना स्थायी निर्देश २६ नुसार करण्यात यावी.)

ब) सदरचा योजनेचा लाभ नियमित कर्मचाऱ्यांपुरताच अनुज्ञेय राहील.(अनियमित व रोजंदारी कर्मचारी यांनी अनुज्ञेय राहणार नाही.)

क) शासकिय कर्मचाऱ्यांना लागु असलेल्या पेक्षा जास्त नाही या मर्यादेत नगरपरिषद आपल्या कर्मचाऱ्यांना असे लाभ देऊ शकेल.

**१८**. नगरपरिषदांनी वरील निर्देशांचे परिपुर्ण पालन करून दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ नियमाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

Manoj Vijay Ranade
Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2025.02.28 16:26:06 +05'30'

**(मनोज रानडे भा.प्र.से)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

प्रत माहितीसाठी अग्रेषित :

१) मा. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा,सर्व विभाग.
५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
६) निवड नस्ती.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
२) अध्यक्ष /प्रशासक, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
३) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).

**प्रपत्र - अ**

**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार दिव्यांगाच्या पदभरतीची माहिती ठेवण्यासाठी बिंदु नामावलीचा विहीत नमुना.**

| भरती वर्ष | पदाचे नाव | रोटेश क्रमांक | बिंदु क्रमांक | दिव्यांगाच्या खालील विविध प्रकारापैकी विहीत दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीसाठी सुनिश्चित करण्यात आले आहे काय? | | | | आरक्षित किंवा अनारक्षित (आरक्षित असल्यास ज्या सुनिश्चित प्रकारा साठी आरक्षित असेल तो गट नमुद करावा.) | ज्याव्यिक्ती ची नियुक्ती करण्यात आली त्या व्यक्तीचे नाव व दिनांक | नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा अ,ब,क,( ड व इ) मधील प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड व ई | | | | |
| | | | | | | | | | | | |

**प्रपत्र - ब**

**मागणी पत्रासोबत सादर करावयाचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की,दिव्यांग अधिनियम २०१६ जो दिनांक १९/०४/२०१८ रोजी अमंलात आलेला आहे त्यामधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तीसाठी विहीत करण्यात आलेल्या आरक्षणाच्या काटेकोर अमंलबाजावणीची काळजी घेवुन हे मागणीपत्र पाठविण्यात येत आहे.
सोबतच्या मागणीपत्रात देण्यात आलेली रिक्त पदे हे बिंदु क्रमांक ______ वरील चक्री (रोटेशन) क्रमांक ______ मधील १०० बिंदुनामावलीतील रोस्टर मधील _____ इतकी रिक्त पदे विहीत दिव्यांग असलेल्या व्यक्तीसाठी आरक्षित आहे.

सक्षम
नियुक्ती
प्राधिकारी